शनिवार दि.५ ऑक्टोबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ३२
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

# हर्षवर्धन पाटील यांच ठरलं:तुतारी हाती घेऊन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करणार

## कार्यकर्त्यांशी संवाद साधत,पत्रकार परिषदेत केली भूमिका स्पष्ट

**हर्षवर्धन पाटील म्हणाले,जनतेच्या मनात एकच आहे की मी निवडणूक लढवली पाहिजे.मी नुकतीच शरद पवार यांची भेट घेतली,यावेळी त्यांनीही मला सांगितले की तुम्ही विधानसभेची निवडणूक लढवली पाहिजे.शरद पवारांनी मला विचारलं तुम्ही काय निर्णय घेणार ?तुम्ही भाजपात आहात.त्यावर शरद पवार म्हणाले की जनतेचा आग्रह आहे तर तुम्ही निर्णय घ्या.बाकी गोष्टीची काळजी मी घेईन.हा कार्यक्रम झाल्यानंतर पत्रकार परिषद घेईन.त्यानंतर निर्णय जाहीर करेन.असेही पाटील यांनी सांगितले.तुम्ही सांगा राष्ट्रवादीत जायचं का ?त्यावर उपस्थितांनी होय आणि रामकृष्ण हरी वाजवा तुतारीच्या घोषणा दिल्या.हर्षवर्धन पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाणार हे आता निश्चित झालं आहे.**




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

पाटील यांनी निवडणुकीच्या तोंडावर भाजपाला सोडचिठ्ठी दिली आहे.मात्र हा निर्णय घेण्यापूर्वी त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती.या भेटीचा उल्लेख करत ते पुढे म्हणाले,मी काही दिवसांपूर्वी देवेंद्र फडणवीस यांनाही भेटलो.त्यांची आणि माझी दिड ते दोन तास चर्चा झाली.देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची भूमिका मांडली. त्यानंतर मी पण माझी भूमिका मांडली.तसंच दोन महिने तुम्ही मांडलेली भूमिका या सगळ्यावर सविस्तर चर्चा झाली.मी त्यांना सांगितलं की तालुक्यांतल्या लोकांचा जो आग्रह आहे त्याविरोधात मला जाता येणार नाही.माझ्या कार्यकर्त्यांनी माझ्यासाठी संघर्ष केला आहे,अन्याय सहन केला आहे.सामान्य माणसांनी माझी साथ सोडली नाही.तुम्ही सांगताय तो निर्णय मी घेतला तर तो व्यक्तिगत निर्णय होईल.त्यामुळे मला जनतेच्या प्रमाणे मला निर्णय घ्यावा लागेल.त्यावर मला देवेंद्र फडणवीस म्हणाले की माझ्या अडचणीही तुम्ही समजून घ्या,तुम्हाला जो निर्णय घ्यायचा तो घ्या.त्यानंतर मी शरद पवार यांची भेट घेतली.असंही हर्षवर्धन पाटील म्हणाले.

तत्पूर्वी हर्षवर्धन पाटील यांची मुलगी अंकिता पाटील-ठाकरे या देखील भाजपच्या युवा मोर्चा पुणे जिल्हा अध्यक्षपदाचा आज राजीनामा देणार आहेत.याबाबत प्रसारमाध्यमांशी बोलताना अंकिता पाटील-ठाकरे म्हणाल्या की,हर्षवर्धन पाटील साहेब जे काही आहे ते पत्रकार परिषदेत बोलतील. कार्यकर्त्यांचा आग्रह आहे की,साहेबांनी शरद पवार पक्षात प्रवेश करावा,याबाबात साहेबच स्पष्टीकरण देतील असेही अंकिता पाटील-ठाकरे म्हणाल्या. भाजपच्या सर्व पदांचा मी आज राजीनामा देणार असल्याचे अंकिता पाटील-ठाकरे यांनी सांगितले. विधानसभेची निवडणूक डोळ्यासमोर समोर ठेवून मी फक्त युवा पदाधिकारी म्हणून कार्यरत राहणार असल्याचे अंकिता पाटील-ठाकरे म्हणाल्या.

दरम्यान,महायुतीत इंदापूरची जागा अजित पवारांच्या राष्ट्रवादीला मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे मागील ५ वर्ष या मतदारसंघात तयारी करणाऱ्या हर्षवर्धन पाटील यांनी दुसरा पर्याय शोधला आहे.हर्षवर्धन पाटील हे पवारांच्या राष्ट्रवादीत जातील अशी चर्चा गेल्या महिनाभरापासून सुरु होती.त्यात सिल्व्हर ओकवर झालेल्या भेटीनंतर त्यांचा पक्षप्रवेश निश्चित मानला जात होता.पक्ष प्रवेशानंतर इंदापूरात हर्षवर्धन पाटील तुतारी चिन्हावर शरद पवार यांच्या पक्षाकडून उमेदवार म्हणून विधानसभा निवडणुक लढवणार असल्याची माहिती समोर आली आहे.

सध्या इंदापूर मतदारसंघात दत्तात्रय भरणे विद्यमान आमदार आहेत.ते अजित पवारांच्या राष्ट्रवादीसोबत आहेत.महायुतीत ज्याचा आमदार त्या पक्षाला ती जागा सोडण्याचा फॉर्म्युला ठरविण्यात आला आहे. त्यामुळे इंदापूरची जागा अजित पवारांच्या वाट्याला जाणार आहे.त्यामुळे हर्षवर्धन पाटील नाराज होते. लोकसभा निवडणुकीत हर्षवर्धन पाटील यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांसह सागर बंगल्यावर जाऊन देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली होती. लोकसभेवेळीच विधानसभेचा शब्द द्या अशी भूमिका तेव्हा हर्षवर्धन पाटील यांच्या समर्थकांकडून घेतली जात होती.स्वतः फडणवीस यांनी इंदापूरात जात कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला होता.मात्र विधानसभेला तिकीट मिळणार नाही हे लक्षात येताच हर्षवर्धन पाटील यांनी दुसऱ्या पक्षात जाण्याचा मार्ग स्वीकारला.

कार्यकर्त्यांकडून तुतारी चिन्हावर लढण्याचा आग्रह होता.गेल्या काही दिवसांपासून हर्षवर्धन पाटील हे मतदारसंघात गाठीभेटी आणि विविध कार्यक्रमांना हजेरी लावत होते.कुठल्याही परिस्थितीत विधानसभा निवडणूक लढावायचीच असा चंग हर्षवर्धन पाटील यांनी बांधला आहे.त्यात कार्यकर्त्यांकडून शरद पवारांच्या राष्ट्रवादीची तुतारी हाती घ्या असा आग्रह धरण्यात येत होता. आणि त्यावर आज शिक्का मोर्तब झाला.

# ग्रामीण वक्तृत्व स्पर्धेत इंदिरा कन्याची आरती जिवडे प्रथम,वस्ती शाळेची आकांक्षा पालवे द्वितीय

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

तालुक्यातील धामणगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेमध्ये झालेल्या ग्रामीण शालेय वक्तृत्व स्पर्धेत इंदिरा कन्या विद्यालय धामणगावची आरती नामदेव जीवडे हिने प्रथम क्रमांक पटकावला. तर जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा पालवे वस्ती येथील आकांक्षा बुवासाहेब पालवे ही द्वितीय आली. जिल्हा परिषद माध्यमिक शाळा धामणगावची नम्रता राजेंद्र मुळे हिने तृतीय क्रमांक मिळवला.दिव्या पोपट जीवडे व श्रावनी शरद लोखंडे या दोघींनी उत्तेजनार्थ बक्षीस मिळवले.



वक्तृत्व कलेतून उद्याचे नेतृत्व घडावे या हेतूने मराठा सेवा संघाच्या वतीने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे अध्यक्ष इंजि.तानाजी बापूं जंजिरे हे होते.आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये इंजि. जंजिरे बापू म्हणाले की, समाजातील मोठ्या समुदायासमोर आपल्या भावना,आपले विचार व्यक्त करण्यासाठी वक्तृत्व कला हे प्रभावी माध्यम आहे. शालेय जीवनामध्येच विद्यार्थ्यांनी हा गुण आत्मसात करावा. यापुढील शालेय वक्तृत्व स्पर्धा दिवाळीनंतर खुंटेफळ केंद्रावर घेण्याचे त्यांनी जाहीर केले.

जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हा अध्यक्षा शिवमती सुवर्णाताई गीरे, शिवश्री भास्करराव निंबाळकर, डॉ. दत्ता नरसाळे,शिवश्री बन्सीधर मोरे, सरपंच मनोज गाढवे, शालेय समितीचे अध्यक्ष शरद चौधरी या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती यावेळी होती. स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा.डॉ. गायकवाड सर, समाजसेवक संतोष दानी सर, व मिलिंद नेटके सर यांनी काम पाहिले.प्रास्ताविक भाषण संयोजक ऍड सीताराम पोकळे ज्येष्ठ पत्रकार यांनी केले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन शिवमती संगीता होळकर मॅडम यांनी केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संयोजन समितीचे अध्यक्ष हिरामण पोकळे सर, मोरे सर, स्नेहलता थोरवे मॅडम, राऊत सर, ढोबळे सर,पत्रकार दादा पवळ ,यजमान शाळेतील शिक्षक वृंद आदींनी परिश्रम घेतले. आभार प्रदर्शन शिवमती हर्षदा जिंजूरके मॅडम यांनी केले.

# दिगंबर भुजबळ यांना ध्येय राज्यस्तरीय गौरव पुरस्कार२०२४ ने सम्मानित



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

महाकवी कालिदास नाट्यमंदिर शालीमार नाशिक येथे दिनांक २ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण झाले. यावेळी कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून श्री. उत्तम कांबळे - ज्येष्ठ पत्रकार व लेखक , तसेच प्रमुख पाहुणे माननीय दिनकर टेमकर माजी शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य पुणे , प्रमुख वक्ते श्री दिनेश आदलिंग व प्रमुख आकर्षण अभिनेते रिशी जोरवर हे होते तसेच प्रमुख उपस्थिती माननीय श्री अरुण धामणे माजी शिक्षणाधिकारी होते. दैनिक युवा ध्येय या वृत्तपत्राच्या तेराव्या वर्धापन दिनानिमित्त व नाशिक विभागीय कार्यालय शुभारंभ निमित्त विशेषांकाचे प्रकाशन व पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता या सोहळ्यामध्ये श्री दिगंबर भुजबळ यांनी केलेल्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याचा गौरव म्हणून त्यांना राज्यस्तरीय ध्येय गौरव पुरस्कार २०२४ उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी श्री भागवत महाले सर व त्यांचे बंधू ,शंकर शेलार सर व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते .

# माय मराठीसाठी सोन्याचा दिवस मुख्यमंत्री शिंदे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

आजचा दिवस मराठी भाषा आणि मराठीवर प्रेम करणाऱ्यांसाठी सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवावा असा ऐतिहासिक आहे. जगभरात, सातासमुद्रापार पोहचूनही तिथे मराठी भाषा, सणवार उत्सव जोपासणाऱ्यांसाठी गौरवाचा, अभिमानास्पद दिवस आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे. यासाठी त्यांनी राज्यातील जनतेचे अभिनंदन केले आहे. केंद्रीय मंत्रीमंडळाच्या या निर्णयाचे स्वागत करतानाच, मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी राज्यातील मराठी प्रेमी, तसेच साहित्यिक, संशोधकांनी केलेल्या प्रयत्नांचेही कौतुक केले आहे.

## चारोळी

इर्षा तुलना कशास करावी ?
स्वतःच्या प्रगतीची आस धरावी
बदलाच्या चक्राची पाती फिरावी
नविन्याच्या शोधात झोळी भरावी

रंजना सानप
मायणी (सातारा)

# ११ऑक्टोंबर रोजी येणाऱ्या बौद्ध समाज संवाद यात्रा निमित्त हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा-नागवंशी संघपाल पनाड



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

लोणार शहरात ठिकठिकाणी श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशाने रेखाताई ठाकूर, अशोक सोनोने, धैर्यवर्धन पुंडकर, सविताताई मुंडे, निलेश जाधव, प्रशांत वाघोदे, विष्णू उबाळे, डॉ. प्रा. केबी इंगळे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली लोणार व मेहकर येथे वडगाव, सुलतानपूर, चिंचोली सांगळे ,लोणार शहर येथे कॉर्नर बैठका घेण्यात आल्या. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून. जिल्हा नेते आद. प्रशांत वाघोदे यांनी आंबेडकरी चळवळी संदर्भात मार्गदर्शन करून समाजाने व्यसनापासून दूर राहून कुटुंबासह समाजाला उंच स्थानावर न्यावे व बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतर समाज जागृतिचे, समाज रक्षणाचे,काम श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर करत आहेत. त्यामुळे समाजाने कुठल्याही भुलथापांना बळी न पडता बाळासाहेब आंबेडकर यांचे हात मजबूत करावे. येणाऱ्या ११ तारखेला बौद्ध समाज संवाद यात्रेला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन केले. यावेळी प्रस्ताविक डॉ. प्रा. केबी इंगळे यांनी केले. तर आभार प्रदर्शन दिपक अंभोरे यांनी केले, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महिला आघाडीच्या ज्येष्ठ नेत्या उषाताई नरवाडे, शाकीरभाई पठाण, महेंद्र मोरे, प्रशिष इंगळे, जेष्ठ नेते सुभाष मोरे,ड, बबन वानखेडे,दिपक पाडमूख, प्रदीप सरदार,राहुल सरदार,अनिल प्रधान अचित पाटोळ, मोरे साहेब मिलिट्री मॅन, दिनकर कांबळे, बबन पनाड ,विलास खरात, वसीम भाई यांनी परिश्रम घेतले यावेळी शेकडो महिला व पुरुष उपस्थित होते..

# रस्त्यासाठी नवीन हातला ग्रामस्थाचा विधानसभा मतदानावर बहिष्कारर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**



पूर परिस्थितीच्या संभाव्य धोक्याखाली असलेले जुने हातला हे गाव शेत सर्वे नंबर २२ ईक्लाश गावठाण या ठिकाणी प्रशासनाने स्थलांतरित करून नवीन हातलावस्ती निर्माण करण्यात आली परंतु गावात ये जा करण्याकरिता रस्ता नसल्यामुळे गावकऱ्यांसह शाळकरी विद्यार्थ्यांचे अतोनात हाल होत आहेत तसेच गरोदर माता व रुग्णांना त्याचा अतोनात त्रास होत आहे तेव्हा या रस्त्याचे काम त्वरित सुरू करा अन्यथा आगामी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्यात येईल असा ईशारा निवेदनातून जिल्हाधिकारी प्रशासनाला केला आहे यापूर्वीही गावकऱ्यांनी लोकसभा निवडणुक मतदानावर बहिष्कार टाकत असल्याचे निवेदन दिले होते परंतु माजी जिल्हा परिषद सदस्य चितंगराव कदम सर यांच्या मध्यस्थीने आमदार नामदेवराव ससाने यांच्यासह प्रशासनाने सांगितले की आम्ही आपल्या रस्त्याचा प्रश्न निकाली काढू तेव्हा मतदान करून आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावेत असे आश्वासन देऊनही त्यावर बऱ्याच कालावधी लोटूनही सुद्धा सदर रस्त्याच्या कामाला कुठलीही मंजुरात नाही व त्या कामाला सुरुवात झाली नाही तर रस्त्यासाठी गावकऱ्याची बोळवण करण्यात आली ही शोकांतिकाच आहे त्यामुळे येथील गावकऱ्यांना रस्त्याच्या मागणीसाठी रेंगाळत राहावे लागते त्यामुळेच विद्यार्थ्यांना शाळेत इजा करण्यासाठी मोठी कसरत ही करावी लागते तर प्रसुतीकरिता महिलांना व रुग्णांना दवाखान्यात नेण्यासाठी अक्षरशा उचलून न्यावे लागते ही स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ही नवीन हातला येथील गावकऱ्यांची शोकांतिकाच म्हणावी लागेल तेव्हा प्रशासनाने नवीन हातला येथील गावकऱ्यांचा प्रश्न त्वरित मार्ग काढून कामाला ताबडतोब सुरुवात करावी अन्यथा यापेक्षाही अन्य लोकशाहीच्या सनदशीर मार्गाने गावकऱ्यांच्या वतीने उपोषण आंदोलन करून आगामी विधानसभा निवडणुक मतदानावर बहिष्कार टाकत असल्याचे निवेदनातून जिल्हाधिकारी प्रशासनाला गावकऱ्यांनी निवेदनातून कळविले आहे.

यावेळी निवेदन देताना सामाजिक कार्यकर्ते कैलासराव चव्हाण,शंकर शिंदे,विजयराव चव्हाण, विनोद गाडगे, सुदर्शन पाईकराव, कैलास गुंडाप्पा, संतोष राठोड, मंगेश चव्हाण, दीपक बर्डे, प्रदीप गुंडाप्पा,शुभम शिंदे,मनोज बर्डे, करण लोखंडे आदींसह नवीन हातला येथील सर्व गावकरी उपस्थित होते.




# अंदमान च्या बेटा वरून

लेखक ❊ धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर



**अमरनाथ यात्री संघाचे अध्यक्ष धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांच्या सिद्धहस्त लेखन शैलीतून रोमांचकारी असणारा अंदमान टूर चा रोज चा वृत्तांत याच ठिकाणी दररोज प्रसिद्ध करण्यात येत आहे. शेकडो वाचकांनी ही लेखमाला कळविले आहे. अनेकांच्या प्रतिक्रिया प्राप्त झाल्या. त्यापैकी निवडक प्रतिक्रिया आजच्या शेवटच्या भागात प्रसिध्द करण्यात येत आहेत. वाचकांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल धन्यवाद.– संपादक**

(भाग ९)

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुकेश धोंगडे**

सर्व लेख खूप छान.विमान प्रवासात ३०० प्रवाशा समोर गाणे म्हणणे आणि ते ही सावरकरांचे... हे करण्याची धमक फक्त आपल्यातच आहे...या पूर्वी असे कधीही घडले नाही...आपण नांदेड चे नाव गाजवले... वंदे मातरम.

**डॉ.प्रदीप राजपूत,संपादक,**
**लेखणीचे वादळ, बहादरपूरा–कंधार**

झालेत बहू, होतिल ही बहू, पण दिलीपभाऊ सारखा प्रखर राष्ट्रभक्त दुर्मिळच...! जयस्तुतै, जयस्तुतै हे विर सावरकरांचे गित चक्क ३५ हजार फुट ऊंचीवर थेट विमानात गायिले, ही घटना आम्ही आमच्या आयुष्यात पहिल्यांदाच पाहिली व ऐकली.

नांदेड येथील धर्मभूषण अॅड. दिलीप भाऊ ठाकूर हे नेहमीच कोणत्या ना कोणत्या नाविन्यपुर्ण उपक्रमांच्या माध्यमातून सदैव जनसेवेत, समाजसेवेत कार्यरत असतात, परंतू या वेळेस तर दिलीपभाऊंनी आश्चर्याचा व स्वाभिमाना तद्वतच् प्रखर राष्ट्रभक्तिचा असा सुखद धक्का दिला की, वाचल्यावर, पाहिल्यावर तर थोडावेळ शब्दच सुचले नाहीत, मनात ती काळ्यापाण्याची शिक्षा, वंदणिय विर सावरकरांचे समुद्राला चिरत नव्हेतर समुद्राला लाजवत असे अदम्य साहस आणि मातृभूमी विषयी असलेली प्राणाहुन ही प्रिय अशी श्रद्धा, आस्था व देशभक्ति, त्यांच्या बंदीवासातील सेल च्या आतिल बोलक्या भिंती व विनायक दामोधर सावरकर यांच्या लिखाणातील एक एक शब्द.....!

काहिही म्हणा, या ध्येय वेड्या, प्रखर राष्ट्रभक्तिने औतप्रोत ठासून भरलेला विर सावरकर प्रेमी अवलियाँ दिलीपभाऊ ठाकूर यांनी ज्या प्रकारे अंदमान बेटावर जाऊन आपल्या देशप्रमी साथीदारांना सोबत घेवून विर सावरकरांच्या पावन चरणी नतमस्तक झाले...! वाह...!दिलीपभाऊ तुम्ही व तुमचे सहकारी आपण खरोखरच भाग्यवान आहातच, ज्या उच्चपराकोटीच्या भूमिवर तुम्ही नतमस्तक झालात, हे सगळं वाचून, ऐकूण व पाहून मन प्रसन्नतर झालेच, स्वाभिमाने वक्षस्फुल्लित होऊन वंदे मातरम्, भारत माता की जय, हे अगदी जोरात आमच्या मुखातून निघाले याचे भानच राहिले नाही.दिलीपभाऊ,तुम्हासणी धर्मभूषण या ऊपाधीने सन्माणित करण्यात आलेले आहे,

पण काहि ही म्हणा,आता धर्मभूषण ही ऊपाधी आज खुप ठेंगणी वाटत आहे हो....!त्रिवार वंदन तुमच्या कार्याला व राष्ट्रभक्तिला.....!

ने मझ शी ने मातृभूमीला.....! हे आपल्या पुढच्या अंदमान टूर मध्ये तुमच्या मुखातून अंदमान च्या भूमीतील सेल्युलर जेल मध्ये उपस्थित असलेल्या सर्वांना ऐकवाल. व त्याचा वृत्तांत आपल्या लेखाच्या मार्फत आमच्यापर्यंत पाठवाल अशी आशा आहे आपण ती पण पुर्ण करालच...

या अपेक्षेने येथेच थांबतो. तुर्त ऐव्हढेच.....!

**प्रा.अशोक देशपांडे , छ. संभाजीनगर**

माझ्या बऱ्याच व्हाट्सअप ग्रुप वर तुमचे प्रवास वर्णनाचे लेख व्हायरल होत होते.ते मी दररोज आवर्जून वाचत होतो.उद्या काय होईल याची उत्सुकता मनाला लागली होती.एवढ्या व्यस्त दिनचर्येत लिखाणासाठी वेळ कधी व कसे काढता ? सोबतच्या प्रवाशांच्या प्रतिक्रिया वाचल्यानंतर माझे असे मत बनले आहे की, जेष्ठ नागरिकांची सहल सुखरूप पार पाडण्यासाठी आपण खूप मेहनत घेता. दरवेळी त्यात यश येते.याचा अर्थ दैवी शक्ती तुमच्या पाठीमागे आहे.तुमच्यावर एकही व्यक्ती नाराज नाही. मोठ मोठ्या ट्रॅव्हल्स कंपन्या भरमसाठ शुल्क आकारून देखील जे समाधान देऊ शकत नाहीत ते तुम्ही माफक दरात देता हे कौतुकास्पद आहे. तुमची समय सूचकता, हजर जबाबीपणा आणि नियोजन किती अचूक आहे याची प्रचिती वाचताना पदोपदी जाणवते. दररोजच्या लेखासोबत जर त्या दिवशीचा एखादा महत्त्वाचा फोटो छापून आला तर आणखी रंगत वाढेल. मी मराठीचा प्राध्यापक असल्यामुळे असा सल्ला देतो की, तुमचे लिखाण दर्जेदार असल्यामुळे तुम्ही तुमचे आत्मचरित्र अवश्य लिहा. तुमची लेखन शैली पाहता तुमचे आत्मचरित्र मराठी साहित्यात मोलाची भर पडेल यात शंका नाही. खूप खूप शुभेच्छा.

**नेताजी भोसले(शिवसेना उद्धव ठाकरे गट सह संपर्क प्रमुख)**

दिलीपभाऊ यांच्या अमरनाथ यात्रेचे जेव्हा दुसरे तिसरे वर्ष असेल म्हणजे २५ वर्षापूर्वी यात्रा करायचा योग आला. तेव्हाच आम्ही मित्रमंडळींनी अंदाज लावला हा माणूस इतर क्षेत्राप्रमाणे टुरिझम क्षेत्रात मोठे नावलौकिक मिळवणार. वेगवेगळ्या घरातील विविध जातीधर्माची वेगवेगळ्या स्वभावाच्या शेकडो लोकांना पंधरा वीस दिवस देशाच्या विविध भागात घेऊन जाणे हे निश्चितच सोपे काम नक्कीच नाही. परंतु अत्यंत शांत, संयमी,मृदुभाषी असलेले दिलीपभाऊ हे काम सहज पार पाडतात हा संशोधणाचा विषय आहे.जिथे जायचे त्या भागाचा कित्येक दिवस अगोदर सखोल अभ्यास करूनच तेथील सहलीचे आयोजन करायचे. एकदा दिलीपभाऊ सोबत यात्रा केलेला प्रवाशी हा कायमचा त्यांचाच होऊन जातो.ज्यांना पर्यटनाची हौस आहे त्यांनी फक्त एकदा दिलीपभाऊ सोबत प्रवास करावा. नक्कीच एक वेगळी अनुभूती मिळेल.

अंदमान निकोबार या द्विप समूहा बद्दल आजपर्यंत माहीत नसलेल्या अनेक बाबीचे या लेखमालेतून उलगडा झाला. खूपच सुंदर अश्या या लेखमालेचे पुस्तकात रूपांतर व्हावे. आपल्या सर्व उपक्रमाला मनस्वी शुभेच्छा...!!

**शेख शफी, ज्येष्ठ पत्रकार**

सर, आपल्या अंदमानच्या बेटा वरून ही लेखमाला वाचली. आपली लेखणी अतिशय सुंदर असून असे वाटत होते की, प्रत्यक्ष दृश्य समोर दिसत आहे.खूप छान माहिती देऊन आम्हाला अंदमान बेटाची संपूर्ण माहिती घरबसल्या मिळाली आहे .सर आपली आठ दिवस पूर्ण लेख मला वाचली आहे आपण अमरनाथ यात्रा व इतर कोणतीही टूर असो संपूर्ण माहिती देत असल्यामुळे आम्हाला बरीच माहिती मिळते. त्याबद्दल आपले खूप खूप धन्यवाद अशीच माहिती आम्हाला सांगत जा ही ही विनंती.

**अमरनाथ यात्री आनंद साताळे**

भाऊ आपण अंदमान टूरला गेल्यावर आम्हाला समजलं. पूर्वी समजले असते तर तुमच्यासोबत आला असतो. अंदमानचे सर्व भाग मला वाचायला मिळाले.ते त्याच्यानंतर आम्ही प्रत्यक्ष अंदमान टूरला गेल्याचा आनंद झाला. पुढची अंदमान टुरसाठी मी अडवान्स पाठविले आहे.आम्ही दोघे १६ जानेवारी चा अंदमान टूर जरूर अटेंड करू. आम्ही अमरनाथ यात्रा गेल्या वर्षी आपल्या सोबत केली असल्यामुळे टूरच्या नियोजनाबाबत जर बोलायचं तर आपणाला शंभर पैकी शंभर गुण दिले पाहिजे.

**बालाजी इंगोले मुखेड**

अतिशय सुंदर मांडणी एखाद्या दर्जेदार साहित्यिकाला लाजवील अशी सत्याची ताकद म्हणजेच आपले शब्द.भाऊ तुमचे लेख क्रमशः वाचल्या नंतर असा भास होतो की, आपण एखादा चित्रपटच पाहत आहोत. इतका जिवंतपणा आपल्या लेखणीत आलेला आहे.असेच नेहमी वेगवेगळी दर्जेदार प्रवास वर्णन ने लिहीत जा. त्यामुळे ज्यांना प्रवास करायला आवडतो पण काही कारणामुळे करता येत नाही त्या असंख्य लोकांना घरी बसल्या वेगवेगळ्या टूर चा आनंद लुटता येईल .

**स्नेहलता जायसवाल, हैदराबाद**

आर्टिकल बढ़िया है। अंदमान ही है बहुत सुंदर, देखने , सोचनें समझने,और वीर सावरकर तथा अन्य कई लोगों को दि गई उनकी पीड़ा और देशभक्ति को समझने लायक हैं। चंहु ओर से पानी से घीरा हुआ सुन्दर द्विप हैं। पानी तो क्रिस्टल वाटर हैं,क्लिन्लीनेस भी अमेझिंग है।बड़ा ही सुन्दर द्विप हैं।

आपके सभी लेख एकदम सविस्तर लिखें गये हैं। मैं तो पूणे से २०२० में जाकर आयीं थी। जैसे जैसे आपके लेख पढ़तीं हु अंडमान आँखों के सामने घुमता हैं ।लेकिन जिसने भी अंडमान नहीं देखा,आपके लेख पढ़कर उसे भी अंडमान देखने का आनन्द मिलेगा।आपकी कार्यक्षमता, कार्य–प्रणाली, खनकदार आवाज, काम करने की तथा किसी भी कार्य को चुनौती पूर्ण करने की इन सब का प्रभाव इस इन आर्टिकल मे दिखाई देता हैं।जहां भी दिलीप ठाकुर होंगे, वहां सबकुछ संभव हो जाता हैं,आप जंगल में भी मंगल मनाने वाले इंसान हैं। इसीलिए हर एक यात्री की चाहत होती है कि जहां भी ट्रीप जाएं दिलीप ठाकुर साथ रहे।आप जहाँ भी जाते हो, कुछ न कुछ नयें नयें कारनामे कर्मवीरों की तरह कर दिखा देते हो। मुझे तो ऐसा लगता हैं, आपकी एक आवाज़ पर हजारों लोग आपकी मदद के लिए खुशी खुशी से आयेंगे। आप एक अविस्मरणीय जादुगर हो। सदैव ऐसे ही रहे। आपकी सेकंड यात्रा कब हैं ? साथ ही एक रिक्वेस्ट हैं गुजरात, राजस्थान और मध्यप्रदेश के डिटेल्स सेंड कीजिएगा।

**नरेंद्र पटवारी (राज्य परिवहन सेवानिवृत्त अधिकारी)**

खुप छान शब्दात विषद केली आहे ट्रिप. वाचतांना समोर प्रसंग अनुभवल्या सारखे वाटले. पुर्वी रेडिओ वरुन क्रिकेट समालोचन ऐकताना मैदानावर कसा खेळ चालु आहे हे समजायचे. तसेच आपल्या लेखमालेतून जाणवायचे.keep it up.

**रामेश्वर वाघमारे**

(संघटना प्रमुख,महाराष्ट्र राज्य नगरपरिषद, नगरपंचायत व संवर्ग कर्मचारी संघटना)

आपले प्रसिद्ध झालेले सर्व लेख वाचले. आपण कोणतेही काम असो मग ते धार्मिक असो,सामाजिक असो,वा टुर असो नियोजन पुर्वक असतात.आपण आता एक चांगले लेखक सुध्दा झालात. कारण अंदमान च्या टुर बद्दल आपण जे काही लिहीत होतात ते सर्व डोळया समोर एखादा चित्रपट पाहिल्यासारखे प्रत्यक्ष पणे उभे रहात होते. त्यामुळे आम्ही या टुरचा भाग आहोत अस वाटत होते. हा आपल्या सशक्त लेखणीचा अविष्कार आहे.स्वातंत्र्यवीर सावरकर याच्या जयजयकार करताना शरीरावर रोमांच ऊभे राहात होते.कोणतही काम कसे उत्कृष्ट करावे याच उत्तम उदाहरण आपण आहात. म्हणून मी नेहमी म्हणतो दिलीप भाऊ है तौ सब मूमकीन है आपल्या लेखातील वर्णन वाचून कधी एकदा अंदमानला जावे अस वाटत आहे.धन्यवाद...घरी बसुन आम्हालाही अंदमान सहल घडवल्या बदल.

**संतोष अमृतराव पांडे,सिडको नवीन नांदेड**

लेखमाला वाचून सर्व वाचकांना कळले असेलच की, दिलीपभाऊ ठाकूर हे किती प्रतिभावान लेखक आहेत ते. नुसते लेखक नाही तर श्रीमान दिलीप ठाकूर साहेब हे गरीब आणि गरजू लोकांना निस्वार्थ अविरत सेवा देणारे आणि ना नफा ना तोटा या तत्वावर अमरनाथ, केदारनाथ, वैष्णव देवी , केरळ , वाघा बॉर्डर, नेपाळ पशुपतीनाथ अश्या या अनेक धार्मिक आणि पर्यटन स्थळी सांभाळून नेणे आनणे हे कार्य स्वतःचा जीव ओतून करतात . दिलीप साहेबा बदल थोडक्यात लिहिणे फार अवघड आहे , कारण त्यांचे कार्य एवढे भव्य दिव्य आहे की मोबाईल वर टाईप करता करता बोट दुखत्तील पण लिहणे संपणार नाही.

खर सांगतो मी श्रीमान दिलीप ठाकूर साहेबा सारखा माणूस किमान आजच्या काळात तर दुसरा बघितला नाही .दिलीप ठाकूर साहेब यांना त्यांचा सदैव प्रेमी असणाऱ्या संतोष पांडेचा वाकून साष्टांग नमस्कार.

**मीना कुलकर्णी**

सर्व भाग वाचत असताना जस काही आपण प्रत्यक्षपणे त्याठिकानाचा अनुभव घेत आहोत असे सारखे वाटते. आपली लेखन शैली खुप सुंदर आहे. दिलीप भाऊ आपणाला एक विनंती आहे की,कैलास मानस सरोवर यात्रा त्वरित काढावी. कारण तुमच्यासोबत अमरनाथ यात्रा केलेली असल्यामुळे मी ठरवले आहे की,भाऊ सोबतच कैलास मानसरोवर यात्रा करायची.

दीपा पंढरपूरकर

खूप छान प्रवास व वर्णन...वाचल्यानंतर प्रत्यक्ष प्रसंग डोळ्यासमोर येतो.खूप सुंदर आणि सुरेख लेखनशैली...

त्यामुळे हवा हवासा वाटतो अंदमान टूर...

**नागेश भानेगावकर**

धर्मभूषण ड.दिलीपभाऊ आपल्यावर भोले बाबाची विशेष कृपा असल्याने आपल्या सर्व टूर यशस्वी होतात.त्या बरोबरच सर्व टूर व यात्रा ह्या अतिशय शिस्तबद्ध असतात.तसेच योग्य नियोजना मुळेच सर्व काही निश्चितच चांगल्या प्रकारे होते. याचा अप्रतिम अनुभव आम्हाला १५ वी चारोधाम यात्रा जी १२ ते २६ मे २०२४ दरम्यान आपल्या मार्गदर्शनासह आपले छोटे बंधू श्री राजेशभाऊ ठाकूर यांच्यासोबत आलेला आहेच.

कुलस्वामिनी रेणुका माता कृपेने आपल्या पुढील सर्व नियोजित यात्रा उत्तरोत्तर निश्चितच चांगल्या होतील यात काही शंका नाही.

**दि.मा.कुलकर्णी, ज्येष्ठ साहित्यिक**

भाऊ,आपले अंदमानच्या बेटावरुन चे वर्णन वाचले. एखाद्या लेखकाला लाजवेल असे वर्णन वाचून मन भारावून गेले.अंदमानला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घेण्यात आले होते तेव्हा आम्ही अंदमानला गेलो होतो. आपल्या लेखणीमुळे आमच्या प्रवासास उजाळा मिळाला.त्रिवार धन्यवाद भाऊ.

**डॉ. संजय महाजन**

क्या बात है भाऊ,खुपच सुंदर आणि सविस्तर अस प्रवास वर्णन. हे सर्व वाचतांना मी स्वतःच तुमच्या सोबत असल्याचा फील आला.बहोत बढीया. पुढच्या वेळेला आम्ही येणारच. तुमच्या सोबत टुरला जाणे म्हणजे आनंदाची पर्वणीच असते. याचा अनुभव आम्ही रामेश्वरम,कन्याकुमारीच्या वेळी घेतला.यावेळी सुध्दा आलो असतो पण टूर आयोजन केल्याचे कळालेच नाही.असो. पुढच्या अंदमान टुरचे डीटेल्स पाठवा.आम्हीसुध्दा बुकींग करतो.

**आनंद बाबाराव मोरे**

साहेब आपले प्रवास वर्णन मला खूप आवडते व आपले सर्व उपक्रम प्रेरणादायी असल्यामुळे मी आपला अनेक वर्षापासून चाहता आहे.असेच आपण उत्तरोत्तर कार्य करत रहा हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**शिवाजीराव पाटील, मुख्याध्यापक निळा**

खूप सुंदर लिखाण आहे.याचे एक छोटे पुस्तकं तयार होऊ शकते. आपल्या सर्व लेखामुळे अंदमान निकोबार बेटाची माहिती घरी बसल्या मिळाली आहे. धन्यवाद दिलीप.भाऊ

**डॉ.गोपाळ चौधरी**

दिलीपजी खूप छान लिहिता.. असंच लिहित रहा.. खूप खूप शुभेच्छा.

**नरसिंग पंजाला**

It would be enough if there was one person like you in every village sir.Our country will go like Vande Bharat train

(समाप्त)

# सांगा धनाचा साठा आमचा राजकिय सत्तेमधला वाटा कुठ हाय ...हो

## बौद्धांना राजकीय सत्तेपासून वंचित ठेवण्याचे काम दोन्ही राजकीय पक्ष तर करत नाहीत ना....

लोकनेता न्यूज नेटवर्क

माय बापाहुन भिमाचे उपकार लय आहे रे... तुम्ही खात्याच्या भाकरीवर बाबासाहेबांची सही हाय रे... तुम्ही आज बसत्या त्या राजकीय❊ सत्तेवर ❊बाबासाहेबांची सही हाय रे...❊

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की,गुलामाला गुलामाची जाणीव करून द्या म्हणजे तो बंड करून उठेल...

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजन समाजाला सांगितले जा आणि आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा तुम्हाला या देशाची शासनकर्ती जमात बनवायचे आहे... डॉ. बाबासाहेबांनी सांगितलेली ही गोष्ट आपण लक्षात घेऊन आज खरच आपण शासनकर्ती जमात बनलो आहोत का? याचे आत्मचिंतन करणे फार गरजेचे आहे....



आज या भारत देशामध्ये मोठ्या प्रमाणात जाती–पातीचे राजकारण चालू असून यामध्ये विविध पक्षांच्या राजकीय नेत्यांनी आपल्या सोयीनुसार राजकारण खेळत काही विशिष्ट समाजातील लोकांचा राजकारणापुरता वापर करून घेत त्यांना असे दाखवायचे की,आम्ही या समाजाचे उध्दारकर्ते आहोत.म्हणत समाजाची दिशाभूल करण्याचे काम करत असतात. आणि मुळात ह्याच राजकीय पक्षांच्या राज्यकर्ते नेत्यांनी केवळ आणि केवळ फक्त बौद्ध समाजाचा कशा प्रकारे वापर करून घ्यायचा आणि त्यांना मिठाच्या खड्याप्रमाणे बाजूला करायचं हे ठरवून घेतले असून त्याला महाराष्ट्रातील बौध्द समाज मोठ्या प्रमाणात बळी पडला असून त्यामुळे या समाजाचे फार मोठ्या प्रमाणात राजकीय व सामाजिक नुकसान होत असून त्यामुळे बौध्द समाज ची होणारी राजकीय दुरावस्था पाहता बौध्द समाज राजकीय सत्तेपासून आजघडीला तरी राजकीय सत्तेपासून कोसोदुर असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे महाराष्ट्रात आपल्याला पाहायला मिळते. भारताला स्वातंत्र मिळवून ७५ वर्ष झाले असून भारत देश स्वातंत्र्य झाल्यापासून ते आजपर्यंत बौद्धांना आपली राजकीय ताकत निर्माण करता आली नाही. त्यामुळे बौद्ध समाजाचा वापर काँग्रेसने मोठ्या प्रमाणात करून बौद्ध समाजामध्ये चुकीची अफवा पसरवून संविधान धोक्यात आहे संविधान बदलणार आहे. असा परपोगंडा चालवत आजपर्यंत फक्त काँग्रेसने मतांसाठी बौद्ध समाजाचा वापर करून घेतला आहे. आणि बौद्ध समाज पण काँग्रेसच्या भुलथापांना बळी पडत आपले राजकीय ताकद कमी करुन घेत राहिले हेच त्यांच्या लक्षात राहिले नाही. जेव्हा त्यांची राजकीय ताकद कमी होत चालली असून फक्त आणि फक्त एका विशिष्ट पक्षाचे आपण गुलाम बनत चाललो आहे. हे कधी बौद्ध समाजाच्या लक्षात आले नाही. त्यामुळे वेळोवेळी काँग्रेस पक्षाने बौद्ध समाजाला संविधानाचा धोका सांगत आपल्या पारड्यामध्ये कसे बौद्ध समाजाचे मते पाडून घेता येतील तसे तो पाडून घेत गेला...

पण जेव्हा महाराष्ट्रात सन २००६ मध्ये म्हणजेच दि. २९ सप्टेंबर २००६ रोजी जगाला काळीमा फासणारी घटना फुले,शाहू, आंबेडकरांच्या महाराष्ट्रातील भंडारा जिल्हा खैरलांजी गावात भैय्यालाल भोतमांगे यांच्या कुटुंबासोबत घडवली असून एका बौद्ध समाजाच्या कुटुंबावर अन्याय अत्याचार करून त्यांचे संपूर्ण कुटुंब उद्धस्त करण्यात आले. तेव्हा या महाराष्ट्रात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची पूर्ण बहुमताची सत्ता होती. पण त्याच काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या सरकारने ज्या खैरलांजी हत्याकांडाने संपूर्ण भारत देशात नाही तर विदेशात पण या घटनेची निंदा करण्यात आली होती.आणि संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठला होता त्यावेळी इथल्या काँग्रेस आणि राष्ट्रवादी पक्षाच्या सरकारने खैरलांजी गावाला तंटामुक्ती पुरस्कार देऊन संबंध




आंबेडकरी समाजाचा जाणून–बुजून अपमान करून बौद्ध समाजावर झालेल्या अन्याय अत्याचारावर पडदा टाकण्याचे काम त्यावेळेसच्या राज्य सरकारने केले होते. तेव्हा हे सरकार किती खऱ्या अर्थाने जातावादी मनुवादी विचारांवर चालणार सरकार आहे.

हेच त्यावेळी काँग्रेस पक्षाने दाखवून दिले आहे.

खरंच काँग्रेस पक्षाला जर खैरलांजी हत्याकांड या घटनेची नोंद घेऊन आंबेडकरी समाजाला न्याय मिळवून देण्याचेही काम करता आले असते.पण ते काम त्यावेळी कॉग्रेस पक्षाने करुन दाखवले नाही. आणि एका विशिष्ट समाजातील लोकांनी एका मुलीवर आणि तिच्या आईवर २२ नालायक औलादीचे गावगुंडांनी जेव्हा बलात्कार करतात तेव्हा या सरकारला कधी जाग आली नाही किंवा बौध्द समाजाबद्दल आत्मियता दाखवता आली नाही... याउलट बौद्ध समाजाला कसे संपायचं हेच काँग्रेस पक्षाने वेळोवेळी प्रयत्न केले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला संविधान देऊन या देशातील सामान्य माणसांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून दिला आणि जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना या भारत देशाला बहाल केली.पण त्याच संविधान निर्मात्याला महामानव, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विरूद्ध काँग्रेस पक्षाने मोठे षडयंत्र रचुन सन १९५२ च्या लोकसभेच्या निवडणुकीत दक्षिण मुंबई येथून पराभव करून त्यांचा अपमान केला. त्यानंतर दुसऱ्यांदा सन १९५४ साली भंडारा लोकसभेच्या पोटनिवडणुकीत मध्ये उभे राहिले असताना त्यांना पुन्हा काँग्रेस पक्षाने जाणून बुजून त्यांच्या विरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोबत काम करणाऱ्या व्यक्तीला उभे करून त्यांचा पराभव करण्यात आला होता....

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काँग्रेसला उद्देशून आपल्या समाजाला आव्हान केले होते की, काँग्रेस पक्ष हे जळतं घर आहे आणि त्या पक्षाचे चाराण्याचे पण सभासद होऊ नका अन्यथा तुम्ही जळून खाक झाल्याशिवाय राहणार नाही असे म्हणाले होते.

लागला करायला झुकुनी सलाम पुन्हा....
भीमा तुझं बाळ आता झालं रे गुलाम पुन्हा...

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या मार्गावर बहुजननायक मान्यवर कांशीरामजी चालत या देशाची आपण कसे राज्यकर्ती जमात बनायची हे ठरवत देशातील सर्वात मोठ्या प्रदेशात म्हणजे उत्तर प्रदेश सारख्या राज्यामध्ये मान्यवर बहुजननायक कांशीरामजी साहेबांनी चार–चार वेळेस सत्ता काबीज करून दाखवले.आणि बुध्द, फुले,शाहु,आंबेडकर,संत रविदास, पेरियार,नारायण गुरु,बिरसा मुंडा यांच्या विचारांचे राज्य प्रस्थापित करण्याचे काम केले. त्यानंतर इथल्या बहुजन समाजाला जागृत करण्याचे कार्य हाती घेऊन बहुजन समाजाला एक नारा दिला बाबासाहेब के बच्चे के बिना इस देश का शासन चलने नहीं दूंगा...म्हणत बहुजन समाजाला असे सांगितले काँग्रेस हे नागनाथ असुन बीजेपी हे सापनाथ आहे. असे म्हणाले होते. बीजेपी हे उघड–उघड वार करत असते पण काँग्रेस पक्ष हे स्लो पैजन असून तो आपल्याला कधी संपून टाकतो हे आपल्या लक्षात पण येऊ देत नाही. त्यामुळे शक्यतो काँग्रेस पासून चार हात लांब रहा असे सांगत बहुजन समाजाला सावध करण्याचे काम मान्यवर कांशीरामजी साहेबांनी केले होते.

जेव्हा आपण आपल्या न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरून एस.सी.,एस.टी. च्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करण्यासंदर्भात सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदेशाच्या विरोधात देशभरात एस.सी.,एस.टी.आणि ओबीसी समाज आंदोलन करतो तेव्हा हेच काँग्रेस पक्ष तेव्हा फक्त बघायची भुमिका घेऊन मुग गिळुन गप्प बसून रहाते... आणि दुसरीकडे मात्र समाजाची दिशाभूल करीत असे सांगत असते..की,संविधान धोक्यात आहे आणि संविधान वाचवण्यासाठी आम्ही प्राण पणाला लावू म्हणत देखावा करत असतो... म्हणुनच आपण काँग्रेस पक्षाची दुप्पटी भुमिका वेळेतच ओळखून काँग्रेस पक्षापासून सावधगिरी बाळगलेली कधीही बरी आहे...

**नांदेड जिल्ह्यामध्ये एकुण नऊ विधानसभा मतदारसंघ असून त्यामध्ये देगलूर–बिलोली विधानसभा मतदारसंघ हे गेल्या पंधरा ते वीस वर्षापासून अनुसूचित जाती (डउ) साठी राखीव ठेवण्यात आले असुन या देगलूर–बिलोली विधानसभा मतदारसंघात आजपर्यंत अनेकांना प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे.**

**पण आज पर्यंत कुठल्याही राजकीय पक्षांना असे का वाटले नाही की,देगलूर–बिलोली विधानसभा या मतदारसंघांमध्ये बौध्द समाजाला पण आपल्या पक्षाकडून उमेदवारी देऊन निवडून आणून प्रतिनिधित्व करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. असे कोणत्याही राजकीय पक्षांना वाटत नसल्यामुळे यावेळी मात्र या मतदारसंघातील बौद्ध समाज राजकीय पक्षांना आपल्या मताची किंमत काय आहे. हे नक्कीच दाखवून दिल्याशिवाय गप्प बसणार नाही. आणि या मतदारसंघातील बौध्द समाज सर्वच राजकीय पक्षावर मोठ्या प्रमाणात नाराज असल्याचे दिसून येत असुन येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये जर बौध्द समाजाला प्रतिनिधित्व करण्याची संधी इथल्या राजकीय पक्षांनी उपलब्ध करून न दिल्यास यावेळी मात्र आपल्या मताची ताकद काय असते हे दाखवल्याशिवाय बौध्द समाज शांत बसणार नाही. याची सर्व राजकीय पक्षांनी नोंद घ्यावी.**

# ओबीसींचा निषेध मोर्चा कंधार उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडकल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

ओबीसी संघर्ष योध्दा प्रा.लक्ष्मण हाके यांच्यावर झालेल्या भ्याड जीवघेण्या हल्ल्याच्या निषेधार्थ सकल ओबीसी समाज, लोहा-कंधारच्या वतीने दि. ४ ऑक्टोबर रोज शुक्रवारी कंधार उपविभागीय अधिकारी कार्यालयावर भव्य निषेध मोर्चा धडकला होता,या भव्य निषेध मोर्चाने कंधारकरांचे लक्ष वेधून घेतले . ओबीसी योध्दा प्रा.लक्ष्मण हाके यांच्यावर दि.३० सप्टेंबर रोजी पुणे येथे काही समाजकंटकांनी भ्याड जिवघेणा हल्ला केला. तसेच त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्नही केला. या घटनेच्या निषेधार्थ सकल ओबीसी समाज, लोहा-कंधारच्या वतीने माजी जि.प.सदस्य चंद्रसेन पाटील सुरनर यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी ४ ऑक्टोबर रोजी कंधार उपविभागीय अधिकारी कार्यालयावर निषेध मोर्चा काढण्यात आला.




सदर मोर्चा सकाळी ११ वाजता माईचे मंदिर, साठेनगर, कंधार येथून सुरुवात झाली, हा मोर्चा प्रियदर्शिनीनगर, बौद्ध व्दारवेस, छ.शिवाजी महाराज चौक, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर, जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, उपकोषागार कार्यालय मार्गे कंधार उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडकला. त्यानंतर या भव्य निषेध मोर्चाचे रुपांतर सभेत झाले. यावेळी अनेक मान्यवरांनी मोर्चाला संबोधित केले. तसेच या भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध केला. यावेळी उपविभागीय अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून नायब तहसीलदार रेखा चामणर यांनी मागण्यांचे निवेदन स्वीकारले. या मोर्चामध्ये ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.संजय पवार, कंधार पं.स.चे माजी सभापती श्रीराम डुबकवाड, कंधार पं.स.चे माजी सदस्य उत्तम चव्हाण, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष ॲड.अंगद केंद्रे, कुंभार संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीराम तेलंग, माजी सैनिक विकास समितीचे जिल्हाध्यक्ष बालाजी चुकलवाड, वंचित बहुजन आघाडीचे माजी तालुकाध्यक्ष वैजनाथ गिरी, आंबुलग्याचे सरपंच प्रतिनिधी माधव मुसळे, नागारवाडीची माजी सरपंच पमलबाई मुंडे, लोहा कृउबा समितीचे संचालक केरबा केंद्रे, लोहा कृउबा समितीचे संचालक केशव तिडके, लोहा भाजप ओबीसी विभागाचे तालुकाध्यक्ष अर्जुन राठोड, लोहा पं.स.चे माजी सदस्य परशुराम वडजे, कंधार पं.स.चे माजी सभापती प्रतिनिधी पंडितराव देवकांबळे, कंधार पं.स.चे माजी उपसभापती भिमराव जायभाये, बंजारा क्रांती दलाचे प्रदेश उपाध्यक्ष सुंदरसिग जाधव, लोहा न.प.चे.माजी नगरसेवक रमेश माळी, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष नारायण आंबुरे, लिंगायत समाजाचे नेते बबन हुलसुरे, डॉ.वैजनाथ राठोड, कंधारेवाडीचे सरपंच शंकरर डिघोळे, बाचोटीचे माजी सरपंच संभाजी हसनवाड, माळाकोळीचे उपसरपंच अरूण सोनटक्के, लोहा भाजप युवा मोर्चाचे सरचिटणीस कृष्णा केंद्रे, मंगरुळचे सरपंच किरण हाके, वडार समाजाचे गोविंद पवार, कंधार खरेदी विक्री संघाचे सदस्य राजीव मुकनर, धावरीचे सरपंच अशोक गित्ते, ॲड.सागर डोग्रजकर, बबन जोंधळे, प्रेमानंद गायकवाड, विहान कदम आदींसह सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध गावचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, सोसायटीची चेअरमन, व्हाईसचेरमन, प्रतिष्ठित नागरिक व असंख्य ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अश्विनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांनी चोख पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.

## विविध घोषणांनी परिसर दणाणला!

**यावेळी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार तथा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर तथा साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर, ओबीसी योध्दा प्रा.लक्ष्मण हाके यांच्या जय घोषणांनी परिसर दणाणला होता.या मोर्चाने वेधले लक्ष या भव्य निषेध मोर्चाने कंधार वासियांचे लक्ष वेधले. या मोर्चात सकल ओबीसी समाज बांधवासह बौद्ध व मातंग समाज बांधव हातात निळे, पिवळे झोंडे व विविध घोषवाक्य असलेले फलक घेऊन मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.**

# मतदारसंघ सुजलाम सुफलाम करण्या साठी आ.शिंदे कुटुंबीय कट्टीबद्ध

## आ.श्यामसुंदर शिंदे दूरदृष्टीचे लोकनेते-आशाताई शिंदे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

लोहा येथे काल दि. ४ ऑक्टोबर रोजी सामाजिक कार्यकर्त्यां आशाताई श्यामसुंदर शिंदे यांच्या हस्ते लोहा शहर व तालुक्यातील सा. बां. विभाग नांदेड अंतर्गत विविध ९० कोटी रुपये विविध विकास कामांचा उद्घाटन व लोकार्पण सोहळा थाटात संपन्न झाला आहे.लोहा सार्वजनिक बांधकाम उपविभागीय कार्यालय परिसरात दुपारी जाहिर सभेचे आयोजन करण्यात आले होते, या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून गंगाधर सावकार सूर्यवंशी, प्रमुख पाहुण्या म्हणून सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई श्यामसुंदर शिंदे, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विक्रांत दादा शिंदे अनुजाताई विक्रांत पाटील शिंदे,संचालक तथा चेअरमन से.सो.हाळद रोहित पा शिंदे,तहसीलदार विठ्ठल परळीकर,उपसभापती श्याम अण्णा पवार, उपसभापती अण्णासाहेब पवार, सरपंच पुंडलिक पाटील बोरगावकर,बालाजी




इसादकर, इंजि. सोमवंशी, समन्वय समिती सदस्य सिद्धू पाटील वडजे, संचालक विश्वम्भर पवार, भाऊराव कंधारे ,ज्ञानेश्वर पाटील पवार,माजी सरपंच दिगंबर पाटील डिकळ राष्ट्रवादी कॉंग्रेस चे तालुकाध्यक्ष प्रभाकर पवार,सरपंच बंडू पा मस्किकर,सरपंच मारोती सोनवळे,मा सरपंच शंकर माने संचालक सुधाकर सातपुते,नागेश हिलाल, फयाज शेख, प्रसाद जाधव,सतीश कराळे सह प्रमुख उपस्थिती होते,यावेळी बोलताना आशाताई शिंदे म्हणाल्या की,आमदार श्यामसुंदर शिंदे साहेबांचे स्वप्न आहे की मतदारसंघात सिंचनाची सोय झाली पाहिजे.जगाचा पोशिंदा शेतकरी राजा जगला पाहिजे यासाठी आमदार शिंदे यांनी मतदारसंघात २४ सिंचन तलावला मंजुरी मिळवून आणली आहे, आमदार शिंदे साहेब हे विकासाभिमुख नेत्रत्व असून आमदार साहेबांना दूरदृष्टी असल्यामुळेच लोहा शहरात व कलंबर आणि सावरगाव परिसरात ९० कोटी रुपयाची न भूतो न भविष्य अशी कामे झाली असून मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कदापि कमी पडणार नसून मतदारसंघाला सुजलाम सुफलाम करण्यासाठी आमदार शिंदे कुटुंबीय सदैव कटिबद्ध असल्याचे आशाताई ताई शिंदे यांनी बोलताना सांगितले,यावेळी मोठया संख्येने कार्यकर्ते पदाधिकारी, महिला भगिनीं, अधिकार उपस्थित होते.

> **“ गेल्या ७५वर्षाच्या काळात कोणत्याही पुढाऱ्याने मतदारसंघात एवढी मोठी विकास कामे केलेली नसून येथील काही पुढारी हे सोसिअल मीडियावरील हिरो आहेत, आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या सारख्या विकासाभिमुख नेत्रतवावर कोणीही टीका केलेली मी यापुढे कदापि सहन करणार नसून विकासाच्या मुद्यावर मतदार संघातील सुजाण जनता येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत भरघोस मतांनी आम्हाला निवडून देतील याचा मला ठाम विश्वास असल्याचे सभापती विक्रांत दादा शिंदे यांनी बोलताना सांगितले.**

# जिजामाता नेत्रालय व राजमाता हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र व आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

स्वर्गीय समिंद्राबाई अण्णाजी लंके व स्वर्गीय मनोहरराव नामदेवराव लंके यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणानिमित्त देऊळगाव राजा तालुक्यातील किन्हीपवार येथे जिजामाता हॉस्पिटल व महिला आरोग्य केंद्र द्वारा संचलित जिजामाता नेत्रालय सिंदखेडराजा व मानव विकास प्रतिष्ठान बुलढाणा संचलित राजमाता हॉस्पिटल देऊळगाव राजा यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी व सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन दिनांक ४ ऑक्टोबर २०२४ रोजी करण्यात आले होते.सदरील शिबिरामध्ये मोफत मोतीबिंदू , काचबिंदू, मधुमेह,रक्तदाब, मुळव्याध, बालरोग,त्वचारोग यासह इतर तपासण्या मोफत करण्यात आल्या त्याचबरोबर रुग्णांना मोफत गोळ्या औषधींचे वाटप करण्यात आले असून सदरील शिबिराचा २४० रुग्णांनी लाभ



घेतला.यावेळी राजमाता हॉस्पिटलचे संचालक डॉ.गोरखनाथ आढाव पाटील,जिजामाता नेत्रालयाचे समाधान देशमुख,सिमोल भालेराव, बाळासाहेब कठोरे,शत्रुघ्न देशमुख आयोजक अनिरुद्ध लंके,नामदेव लंके,जगदीश लंके,दीपक लंके यांच्यासह मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते.

# बालाजी पाटील खतगावकर यांचा मा.खा.प्रताप राव पाटील चिखलीकर यांनी केला सत्कार



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.श्री.एकनाथराव शिंदे साहेब यांचे खाजगी सचिव बालाजीराव खतगावकर यांनी वसंतनगर येथील साई-सुभाष येथे भेट दिली असता चिखलीकर परिवाराच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार सन्मान करण्यात आला.यावेळी भारतीय जनता पार्टी चे हिंगोली लोकसभा प्रमुख रामदास पाटील सुमठाणकर, माजी जिल्हाध्यक्ष व्यंकटराव पाटील गोजेगावकर, भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष अनिल पाटील खानापूरकर, माजी सभापती अनिकेत पाटील राजूरकर, शिवाजीराव कणकटे, अनिल पाटील खानापूरकर, संतोष नारलावार, शिवराज पाटील माळेगावकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# मारोतराव कवळे गुरुजी यांची बळेगाव ता.ऊमरी येथे सांत्वन पर भेट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

ऊमरी तालुक्यातील बळेगाव येथे माधवराव पोलीस पाटील गाढे यांचे चिरंजीव कै.भगवान माधवराव पा गाढे यांचे निधन झाल्याची बातमी कळताच दि.४ ऑक्टोंबर २०२४ रोज शुक्रवारी नायगाव विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय शेतकरी नेते मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी दुःखात सहभागी होत सांत्वन पर भेट दिली. यावेळी त्यांच्या सोबत गावकरी मंडळी उपस्थित होते.



# पात्र असून सुद्धा अपात्र केलेल्या लाडक्या सिस्टर ला न्याय मिळवाण्यासाठी प्रदिप थोरवेंचे ग्रामविकास मंत्री महाजन याना पत्र

## आरोग्य परिचारिका/आरोग्य सेवक महिला पात्र असून सुद्धा अपात्र ठरवता नियुक्ती देत नाहीत तर परीक्षा घेता कशाला-प्रदिप थोरवे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

महाराष्ट्र राज्यात सर्व जिल्हा परिषद अंतर्गत २०२३ मध्ये झालेल्या आरोग्य परिचारिका / आरोग्य सेवक महिला पदभरती ही खइझड कंपनी मार्फत माहे जुन,जुलै २०२४ दरम्याण महाराष्ट्रभर ऑनलाईन केंद्रावर घेण्यात आल्या.या परिक्षे करिता विवीध जिल्हा परिषदे मार्फत देण्यात आलेल्या जाहिराती मध्ये शैक्षणिक पात्रतेच्या अटी मध्ये 'ज्यांची अर्हता प्राप्त सहकारी प्रसाविका आणि महाराष्ट्र परचिर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेली असेल किंवा अशा नोंदणीसाठी जे पात्र असतील असे नमुद करण्यात आलेले होते.त्या प्रमाणे राज्य भरातुन ऋछच् व इडल छ्ीीळपसझालेल्या विद्यार्थ्यांचे फॉर्म भरून घ्येण्यात आले व परिक्षाही घेण्यात आल्या. महोदय यानंतर सदर विद्यार्थ्यांची निवड यादी व त्यानंतर कागदपत्र पडताळी बाबतची यादी जिल्हा परिषदांमार्फत लावुन विद्यार्थ्यांची त्याप्रमाणे कागदपत्र पडताळणी करण्यात आली. परंतु या नंतर अचाणक काही जिल्हयामध्ये GNM व BSc nursing झालेल्या विद्यार्थीनी





जिल्हा परिषद अधिनीयम १९६७ अन्वये आपणास अपात्र करण्यात येत आहे अशी निवड यादी अकोला व जालना इ जिल्हा परिषदां मार्फत लावण्यात आली.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवाप्रवेश (निवड मंडळाच्या सल्याशिवाय) नियम, १९६५ च्या नियम ४ अन्वये करण्यात येणाऱ्या नेमणुकांच्या बाबतीत आणि निवड मंडळाशी संबंधित इतर बावतीत मुख्य कार्यकारी अधिकारी ज्यावेळी विहित केलेली अर्हता धारण करणारे पात्र उमेदवार उपलब्ध नाहीत,असे प्रमाणपत्र देतील अशा वेळी संबंधित विभागीय आयुक्त या नियमात अन्यथा उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त,अशा प्रत्येक प्रकरणांमध्ये,जिल्हा सेवांतील पदावरील नेमणुकीसाठी विहित करण्यात आलेल्या सर्व अर्हता किंवा त्यापैकी कोणतीही अर्हता कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या वर्गाच्या संबंधात शिथिल करण्यास नियुक्ती प्राधिकाऱ्यास परवानगी देऊ शकतील.

त्याच जिल्हापरिषद अधिनीयम १९६७ अन्वये सदरील पदा करिता नमुद करण्यात आलेल्या शैक्षणिक अटी मध्ये परिशिष्ठ पाच (दोन) (अ) भारतीय परिचर्या परिषदेने मान्यता दिलेलली इडउ परिचर्या ही पदवी धारण करीत असतील किंवा (ब) अर्हता प्राप्त परिचारिका प्रसाविका किंवा अर्हता प्राप्त परिचारीका असतील आणि

(तीन) ज्यांची महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झाली असेल किंवा अशा नोंदणीसाठी जे पात्र असतील अशा उमेदवारांमधुन नामनिर्देशनाव्दारे नेमणुक करण्यात येईल असे स्पष्ट नमुद करण्यात आलेले आहे. याकारणास्तव कोणतेही ऋछच् व इडलर्पीीळपस विद्यार्थी अपात्र ठरविता येणार नाहीत...

ही परीक्षा -छच् व्यतिरीक्त दुसरी कोणासाठी न्हवती तर शासनाने आमचे अर्ज का स्वीकारले.

आरोग्य परिचारीका (आरोग्य सेवक महिला) ज्यांची अहार्त प्राप्त सहयाकारी प्रसाविका आणि महाराष्ट्र परिचार्या परिषदेंमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेली असेल किंवा अश्या जे पात्रअसतील.वरील अधोरिकित केलेल्या वाक्यांमूळे असे स्पष्ट होते की महाराष्ट्र परिचार्या परिषदेमध्ये नोंदणी असलेले पात्र उमेदवार आहेत.

तसेच ANM हा मुद्दा जाहीर केला नाही किंवा उच्चशिक्षीत ऊळश्रिार डिग्री मान्य नाही याची स्पष्ठता दिली नाही दोन अर्थ असलेली जाहिरात हे समजना कठीण आहे.

तरी ग्रामविकास मंत्री मा गिरीश महाजन यांनी सदरील विषयी सर्व उच्च शिक्षीत बेरोजगार असलेल्या महिलांचा व गुणवत्तेचा विचार करून त्याना सर्वांना निवड यादी प्रमाणे नियुक्ती देवुन उपकृत करावे अशी विनंती आप चे महाराष्ट्र संघटन मंत्री प्रदिप थोरवे यांनी केली आहे.

# पिंपळगाव जोगा धरणास स्वर्गीय आमदार झांबरशेठ यांचे नाव देणार: अतुल बेनके

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**ओतूर । मयूर ढोबळे**

जुन्नर तालुक्याच्या विकासामध्ये स्वर्गीय आमदार श्रीकृष्ण रामजी तांबे यांचे महत्त्वाचे योगदान राहिले आहे. त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी पिंपळगाव जोगा धरणास श्रीकृष्ण जलाशय नाव देण्यात येईल, असे प्रतिपादन जुन्नर चे आमदार अतुल बेनके यांनी येथे अध्यक्षपदावरून बोलताना केले.ग्रामविकास मंडळ ओतूर चे विद्यमाने स्वर्गीय आमदार श्री कृष्ण रामजी तांबे यांचा ५१ वास स्मृती दिन व त्यानिमित्ताने देण्यात येणारा श्रीकृष्ण भूषण पुरस्कार व माजी आमदार स्वर्गीय लता नानी तांबे भूषण पुरस्कार वितरण सोहळ्यानिमित्त आमदार बेनके बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी आमदार बाळासाहेब दांगट, शरद सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष अनंतराव चौगुले , तालुका अध्यक्ष तुषार थोरात, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मोहित ढमाले, ' विघ्नहर' चे संचालक धनंजय डुंबरे, माजी संचालक विलास दांगट, माजी सभापती विशाल तांबे, शरद बँकेचे माजी उपाध्यक्ष विनायक तांबे, शिवसेना उबाठा गटाचे जिल्हा प्रमुख शरद चौधरी जुन्नर तालुकाप्रमुख माऊली खंडागळे,सामाजिक कार्यकर्ते सर्जेराव गाढवे, सरपंच डॉ.छाया तांबे, उपसरपंच प्रशांत डुंबरे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष महादेव ओतूरकर, गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे मानद सचिव वैभव तांबे, ग्रामविकास मंडळाचे उपाध्यक्ष राजेंद्र डुंबरे, माजी अध्यक्ष माधवराव डुंबरे,
प्रवीण वल्हवणकर, आत्माराम गाढवे, भास्कर डुंबरे, अमोल डुंबरे, रोहिदास घुले, बाळासाहेब घुले, सिताराम डुंबरे, नितीन तांबे, गोविंद डुंबरे, किशोर तांबे, गणी मोमीन, प्रकाश डुंबरे, संतोष तांबे, डॉ.गोविंद डुंबरे, जयप्रकाश डुंबरे, एपीआय लहू थाटे,शांताराम पानसरे, अशोक अहिनवे,ज्ञानेश्वर पानसरे, शिवाजी अस्वार, प्रतीक अकोलकर,राजश्री भालेकर, तंटामुक्तीचे अध्यक्ष जयवंत डुंबरे, महेंद्र पानसरे, पांडुरंग ढोबळे, राहुल शेरकर, रामजी तांबे, नितीन डुंबरे , वैभव डुंबरे,जय बजरंग प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनिल डुंबरे, झांबर जाधव, रा.ज्ञा.डुंबरे, व्ही. एन.सुतार, भिवाजी माळवे, बॉर्डर लेस पँथर चे ज्येष्ठ सदस्य, जय बजरंग चे चेअरमन देवीदास तांबे, दत्तात्रय डुंबरे, गोपाळा घुले, अरुण घुले, छबुराव तांबे, हेमंत पा. डुंबरे, संजय हिरे, अनिल उकिरडे, संतोष सोनवणे आदी मान्यवर ग्रामस्थ शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित



होते. यावेळी माजी सेवानिवृत्त कक्ष अधिकारी दिलीप धोंडीभाऊ घोलप यांना त्यांच्या प्रशासकीय आणि सामाजिक सेवेतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल तसेच कोरोना काळातील कामाबद्दल श्रीकृष्ण भूषण पुरस्काराने गौरवले गेले. तसेच बारामती येथील सामाजिक कार्यकर्ती आणि सावली अनाथालयाच्या संस्थापिका झरीना अहमद खान यांना त्या करीत असलेल्या अनाथ मुलांना 'माणूस' बनवण्याच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल माजी आमदार लता नानी श्रीकृष्ण तांबे भूषण पुरस्काराने मान्यवरांच्या शुभ हस्ते गौरवले गेले. यावेळी या दोन्ही व्यक्तींना मानचिन्ह ,मानपत्र ,शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन अतिशय सन्मानाने गौरवले गेले.यावेळी बेनके म्हणाले की,शाश्वत विकासासाठी मी कायम कटिबद्ध आहे. झरीना खान यांचे बारामती येथील सावली अनाथालयातील कार्याचे ही त्यांनी कौतुक केले. तसेच ओतूर येथील कपर्दीकेश्वर देवधर्म संस्थेला तीर्थक्षेत्राचा ब दर्जा मिळण्यासाठी व कोरोना काळात श्री दिलीप घोलप यांनी केलेल्या कार्याचे कौतुक केले. झरीना खान आणि दिलीप घोलप या दोन्हीही पुरस्कारार्थींचे सामाजिक काम समाजाला प्रेरणादायी व दिशादर्शक असल्याचे मत माजी आमदार शरद सोनवणे यांनी व्यक्त केले. समाजाला सध्या ग्लानी आली आहे, ती ग्लानी दूर करा, असेही ते यावेळी बोलले. ज्येष्ठ नेते अनंतराव चौगुले ,माजी आमदार बाळासाहेब दांगट यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. सत्काराला उत्तर देताना झरीना खान म्हणाल्या की,ओतूर हे माझे माहेर आहे. येथील माणसे आणि येथील माती यांच्याशी माझे घट्ट नाते जोडले गेले आहे. माजी आमदार स्वर्गीय लता नानींच्या नावाने दिलेला हा पुरस्कार मला निश्चितच अभिमानास्पद आणि घरातल्या माणसांनी केलेला सत्कार आहे. त्यामुळे माझ्यासाठी हा पुरस्कार खूप मोठा आहे, असेही त्यांनी विनम्रपणे सांगितले. जिल्हा परिषद शाळा, सुमनबाई भोर, माध्यमिक शाळा, ग्रंथालय, याही गोष्टींना त्यांनी उजाळा दिला. दिलीप घोलप सत्काराला उत्तर देताना म्हणाले की,मला लहानपणापासूनच महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाच्या विचारांची परंपरा लाभलेली आहे. कोणतेही काम करताना प्रामाणिकपणे आणि सचोटीने केले तर निश्चितच त्याचे समाधान खूप असते. पुरस्काराबद्दल त्यांनी संस्थेचे आभार मानले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक संस्थेचे सचिव प्रदीप गाढवे यांनी तर मानपत्र वाचन व सूत्रसंचालन पुरस्कार समितीचे कार्यवाह भाऊसाहेब खाडे यांनी केले. सहसचिव पंकज घोलप यांनी आभार मानले.

### सत्यशोधक शेतकरी संघ विधानसभा निवडणूक लढवणार

# उमरखेड-महागाव विधानसभे ची निवडणूक आता जनतेनी हातात घ्यावी-डॉ.वि.ना.कदम

## लोकप्रतिनिधीला मिळणाऱ्या मानधनावरच समाधान मानणारा उमेदवार मतदारांना पाहिजे आहे-नितीन महेश्वरी, कार्यअध्यक्ष सत्य शोधक संघ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**

उमरखेड महागाव विधानसभा मतदारसंघाचा पाहिजे तसा विकास झाला नाही जनतेच्या मनात लोकप्रतिनिधीकडून खूप आशा आकांक्षा होत्या, आतापर्यंत अनेक पक्षाच्या निवडून आलेल्या लोकं प्रतिनिधीनी केवळ आश्वासनाची खैरात केली परंतु जनतेच्या जीवन मरणाचा एकही प्रश्न सुटलेला नाही दैनंदिन जीवनातील साधे साधे प्रश्न जसे पिण्याचे शुद्ध पाणी, गुणवत्ता असलेले रस्ते, शाश्वत वीज पुरवठा, शेतमालाला भाव, शिक्षण, आरोग्य,बेरोजगारांना रोजगार, पैनगंगा नदीवर साखळी बंधारे व उर्वरित रखडलेले कॅनल चे काम पूर्ण होणे, शेत मालावर प्रक्रिया होण्यासाठी एखादा प्रक्रिया उद्योग, दुग्ध पदार्थ साठवणुकी साठी शीत गृह, रस्ते बांधकामामध्ये गुणवत्ता नसणे हे प्रश्न




जसेच्या तसे असून सर्वच राजकीय पक्ष यामध्ये अपयशी ठरले आहेत या परिस्थितीचा विचार करून मतदारांना नवा पर्याय देण्यासाठी सत्यशोधक शेतकरी संघ येणारी विधानसभा निवडणूक लढणार आहे अशी घोषणा सुज्ञ मतदाराच्या मेळाव्यात जिजाऊ सांस्कृतिक भवन उमरखेड येथे सत्यशोधक शेतकरी संघाच्या वतीने करण्यात आली आहे. लोकशाही पद्धती मध्ये समाजकारण करण्यासाठी कोणालातरी अधिकार द्यावे लागतात या साठी लोकंप्रतिनिधीची निवड होण्या पर्यंतच राजकारण मर्यादेत पाहिजे परंतु ८० % समाजकारणा ची जागा आता राजकारणाने व्यापली आहे. यामुळे मतदारांना नवीन पर्याय हवा आहे, असे मत या वेळी व्यक्त करण्यात आले. विचारपिठावर अध्यक्षस्थानी नितीन माहेश्वरी, प्रमुख पाहुणे डॉ . वि .ना .कदम, शिवाजीराव भाऊसाहेब माने, उमाकांत मडके, ,देवानंद मोरे श्रीराम पाटील नलावडे,यशवंत गिरी, अँड विलासराव देवसरकर, भाऊराव चव्हाण,वड्डे सर व सर्व सत्यशोधक संघाचे सदस्य उपस्थित होते.परंपरागत राजकीय पक्षाच्या फसव्या आणि लबाड राजकारणाला कंटाळलेल्या सर्व मतदारांनी नवा पर्याय निर्माण करण्याचा निर्धार केला आहे त्यासाठी ज्या उमेदवारांनी सत्यशोधक शेतकरी संघाकडे उमेदवारीची मागणी केली आहे त्यापैकी सुशिक्षित,प्रामाणिक व जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध असलेल्या गुणवत्तापूर्ण उमेदवार निवडण्याची प्रक्रिया अल्पावधीतच पूर्ण करून पुढील रणनीती ठरविणार असल्याची सभेमध्ये ठरले आहे कार्यक्रमाचे प्रास्ताविक देवानंद मोरे यांनी तर संचलन उद्धव गायकवाड यांनी आभार गजानन द दामोदर यांनी केले या सभेला तालुक्यातील मोठ्या प्रमाणात मतदार उपस्थित होते.

# मोटरगा, बावलगाव डोंगरगाव व्यसनमुक्तीसाठी जनजागृती मोहीम



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । शिवकुमार बिरादार**

मुखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे व मुखेड येथील डॉक्टरांच्या पुढाकारातून मुखेड शहर तसेच तालुक्यातील ग्रामीण भागात विविध गावात व्यसनमुक्तीसाठी जनजागृती व मार्गदर्शन अभियान राबविण्यात येत आहे. त्याचनुषंगाने तालुक्यातील डोंगरगाव,बावलगाव व मोटरगा येथे व्यसनमुक्त अभियानाच्या माध्यमातून पोलिस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे, डॉ. ओमकार मांजरीकर व डॉ. पत्की यांनी बिडी, तंबाखू, दारु, गुटखा गावकऱ्यांना मार्गदर्शन केले. इत्यादी विषयावर व्यसनमुक्तीसाठी
यावेळी सरपंच सौ. अंजनबाई यशवंत कांबळे, मुखेडचे पोलिस पाटील माधवराव टाकळे, पोलिस पाटील भारत कांबळे, पोलीस पाटील योगेश सुभाषराव औरादे सह गावातील प्रतिष्ठित नागरिक व ग्रामस्थ उपस्थित होते. तसेच मोटरगा येथिल सरपंच, उपसरपंच, पोलिस पाटील, तंटामुक्तीचे अध्यक्ष, सोसायटी चेअरमन, सोसायटीचे संचालक, ग्रामपंचायत सदस्य गावातील नागरिक उपस्थित होते. मोटर्यात १२० जणांनी नशामुक्ती औषधीचे सेवन केले. याप्रसंगी पोलीस निरिक्षक केंद्रे यांचा त्यांनी चांगल कार्य करत असल्याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा व उपस्थित सर्व मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष गंगाधर सोंडारे यांनी केले. तर डॉ.ओमकार मांजरीकर व डॉ. पत्की यांनी व्यसनमुक्त जिवन जगण्याचे स्वतःला व कुटुंबाला किति फायदेशिर असते याविषयी सविस्तर मार्गदशन केले. यावेळी केंद्रे बोलताना म्हणाले की मद्य प्राशन करणा-याला व विकणा-याला या दोघानांही सुधारणे आवश्यक वाटते असे परखड मत व्यक्त केले. तसेच गावातील तरुणांनी स्वयंस्फुतीर्ने नशामुक्त औषधी घेवुन व्यसनमुक्त जीवन जगण्याचे आवाहन केले तेव्हां अनेक तरूण व वयोवृद्ध मंडळी स्वताःहुन औषधी घेवून व्यसनमुक्तीचा संकल्प केला आहे. यावेळी गावातील युवा वर्ग, गावकरी उपस्थित होते.

# शरचंद्रपवार फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा

## व्हेनच्युअर केंद्रात कार्यशाळेसाठी उपस्थिती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**ओतूर । मयूर ढोबळे**

श्री.गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा,पुणे नियंत्रित व्हेनच्युअर केंद्र , पुणे या ठिकाणी व्यवसाय - उद्योग सुरुवात व प्रयोगशाळा सुविधा प्रात्यक्षिक या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत अंतिम वर्ष पदवी औषधनिर्माणशास्त्र शाखेचे ३५ हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .गणेश दामा यांनी दिली.सदर कार्यशाळेचे आयोजन सी. एस.आर भागीदार कार्पोरेट सामाजिक जबाबदारी या पार्श्वभूमीवर व्ही.सी ऍनालिटी क्स, टेन एक्स इन,व्हेनच्युअर सेंटर, एक्सपांडेड पोलिमर सिस्टीम यांच्या सहयोगातून केले होते. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा ही देश पातळीवरील रसायन शास्त्रातील नाविन्यपूर्ण यंत्रसामग्रीने सुसज्ज असणारी प्रयोगशाळा असून विद्यार्थ्यांसाठी प्रयोगशाळा यंत्रसामग्री प्रात्यक्षिके खूपच फायदेशीर ठरले आहे असे मत विद्यार्थी



प्रतिनिधींनी मांडले. कार्यशाळेमध्ये व्यावसायिक व उद्योग जगतातले तज्ञ प्रवक्त्यांनी देखील विद्यार्थ्यांना उत्तम प्रकारे मार्गदर्शन केले. यामध्ये मुग्धा लेने मुख्य प्रवक्त्या यांनी नट आणि बोल्ट निर्मिती, विज्ञान आणि तंत्रज्ञान संबंधित व्यवसाय व उद्योग, उत्पादन गुणवत्ता आणि त्याची हमी या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तदनंतर दुसऱ्या सत्रामध्ये डॉ. अस्मिता प्रभारे यांनी देखील अन्न व कृषी व्यवसाय, जैवतंत्रज्ञान या विषयांवर उद्योग निर्मिती व व्यवसाय निर्मिती यावर मार्गदर्शन केले. तसेच अखेरच्या सत्रामध्ये डॉक्टर रुपेश पवार यांनी मोहाच्या झाडापासून तेल निर्मिती या स्वप्रयोग उद्योगावर भाष्य केले. उद्योग व्यवसाय मार्गदर्शन सत्र समाप्तीनंतर प्रयोगशाळेतील साधने संसाधने तसेच यंत्रसामग्रीचे प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. त्यामध्ये एच.पी.एल.सी, जी. सी,एल.सी असे अनेक नाविन्यपूर्ण यंत्रांची माहिती देण्यात आली. कार्यशाळेची समाप्ती विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देऊन करण्यात आली. विद्यार्थ्यांना औषध निर्माण शास्त्र अभ्यास पाठ्यक्रमासोबत अशा शैक्षणिक भेटीतून नाविन्यपूर्ण गोष्टी व प्रात्यक्षिके शिकायला मिळतात. संशोधन विकासातील चालू घडामोडींची माहिती मिळते त्यासाठी महाविद्यालय अशा प्रकारच्या शैक्षणिक भेटी व कार्यशाळेमध्ये सक्रिय सहभागी होत राहील असे प्रतिपादन डॉ. गणेश दामा यांनी केले. सदर शैक्षणिक भेट यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी डॉ.सुमित जोशी व प्रो.चेतन पुलाटे आदी प्राध्यापकांनी अथक परिश्रम घेतले.

# शिक्षिका सौ रंभाबाई पोरे जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षिका तर श्री रामदास कांडगे यांना जिल्हास्तरीय आदर्श लेखनिक पुरस्काराने सन्मानित






■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद आयोजित जिल्हास्तरीय गुणवंत मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर पुरस्कार सन २०२४-२५ शिरूर येथील . विद्याधाम प्रशालेत रविवार दि.२९ सप्टेंबर रोजी संपन्न झाला. श्री छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची सौ.रंभाबाई पोरे यांना जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षिका या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच. श्री छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे लेखनिक श्री रामदास कांडगे यांस जिल्हास्तरीय आदर्श लेखनिक या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. श्री कांडगे सर यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील संघटनात्मक कार्यासाठी हा पुरस्कार त्यांना देण्यात आला. या सोहळ्यासाठी ते सपत्नीक हजर होते..या सोहळ्यासाठी, पुणे विभागाचे शिक्षक आमदार श्री जयंत आजगांवकर तसेच शिक्षणाधिकारी श्री डॉ.भाऊसाहेब कारेकर, माजी आमदार श्री सुर्यकांत पलांडे, शिक्षक माजी आमदार भगवान साळुंखे, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष श्री गुलाबराव गवळे, सचिव श्री नंदकुमार निकम यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. तसेच श्री छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे, प्राचार्य श्री मदन दिवे,ज्युनिअर विभागाचे प्राध्यापक श्री वासुदेव गुंड सर, माध्यमिकचे श्री नंदकुमार मगर सर, प्राथमिक शिक्षिका सौ शशिकला जगताप, शिक्षक परिषदेचे पुणे ग्रामीण चे अध्यक्ष श्री निलेश काशिद, जिल्हा कार्यवाहक श्री महेश शेलार, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष श्री नंदकुमार सागर , सेकंडरी चे उपाध्यक्ष श्री सुधाकर जगदाळे, मुख्याध्यापक संघाचे सचिव श्री मारुती कदम, श्री अनिल साकोरे आजीव सेवक, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, पुणे .जिल्हा शिक्षक परिषद उपाध्यक्ष श्री जितेन्द्र कुमार थिटे , तालुका अध्यक्ष श्री प्रवीण आढाव,कार्यावाहक श्री रविंद्र सातपुते , श्री सोमनाथ भंडारे, तसेच इतर शिक्षण क्षेत्रातील मान्यवर व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाल. सदरील माहिती श्री. सचिन परभाने यांनी दैनिक लोकनेता प्रतिनिधी यांना दिली.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904